सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२१०४८/४९
ई–मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
**Ganeshkhind, Pune – 411007**
**Contact No. : 020-25621048/49**
**E-mail - iqac@unipune.ac.in**
**Website – www.unipune.ac.in**

अंगुसिक/ ५९३

दिनांक : ३१/१२/२०२४

## अत्यंत महत्वाचे व तातडीचे

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये
आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'' च्या अनुषंगाने मुक्त व्यासपीठ उपक्रम राबविणेबाबत.....**

**संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी–२०२२/प्र.क्र. ०९/विशि–३शिकाना, दि. ३० ऑगस्ट, २०२४**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'' ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती पुनर्गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'' ची सुत्रपध्द पध्दतीने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अंमलबजावणी होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठातील विभाग व स्वायत्त महाविद्यालयात शासन निर्णयानुसार नवीन अभ्यासक्रम पध्दती व श्रेयांक पध्दती लागू करण्यात आली आहे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून उर्वरित संलग्नित महाविद्यालयात त्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

यासंदर्भात सर्व विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षण, विद्यार्थी आणि पालकांचे प्रबोधन आणि मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात येत आहे. तरीदेखील काही विषयांबाबत तज्ञांमार्फत आणखी मार्गदर्शन आणि प्रबोधन व्हावे अशी मागणी होत आहे. या अनुषंगाने दर शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० दरम्यान ऑनलाईन पध्दतीने प्रबोधनपर मुक्त व्यासपीठ सुरू करण्यात चे ठरविले आहे.

प्रत्येक शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० या कालावधीत राज्यस्तरीय सुकाणू समितीतील खाली तज्ञ सदस्य ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध असतील.

| अ.क्र | तज्ञ सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | अनिल राव,<br>माजी प्राचार्य, एम.जे.कॉलेज, जळगाव | अध्यक्ष |
| २. | डॉ. डी. टी. शिर्के,<br>कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ३. | डॉ. आर. डी. कुलकर्णी,<br>कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ४. | डॉ. व्ही. एल. माहेश्वरी,<br>कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | सदस्य |
| ५. | डॉ. मुरलीधर चांदेकर,<br>माजी कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | सदस्य |
| ६. | डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन,<br>प्र– कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| ७. | डॉ. माधव वेलिंग,<br>अध्यक्ष, एस. व्ही. के. एम. यांचे सल्लागार व प्र– कुलगुरू, एन. एम. आय. एम. एस., मुंबई | सदस्य |
| ८. | डॉ. विनोद मोहितकर,<br>संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| ९. | डॉ. शैलेन्द्र देवळाणकर,<br>संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |

या सत्रादरम्यान प्राचार्य, संस्थाचालक, अध्यापक, विद्यार्थी, पालक व इतर संबंधित यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी संदर्भातील विचारलेल्या प्रश्नांची उकल व निराकरण त्वरीत वरील तज्ञांमार्फत करण्यात येईल.

तरी, सर्व संबंधितांनी खाली दिलेल्या लिंकच्या माध्यमातून या उपक्रमामध्ये प्रत्येक शनिवारी सहभागी व्हावे.

Online Weekly Series – NEP 2020
Host : Director, DHE, Pune
Topic : Open Interaction with NEP Steering Committee
Day : Every Saturday Time : 11.00 AM
Zoom Link : https://zoom.us/1/99562255769

या उपक्रमाची सुरवात जानेवारी २०२५ पासून होत असून पहिले सत्र शनिवारी दि. ०४ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात येईल.

(प्रा. डॉ. संजय ढोले)
संचालक